# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १३/१०/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

### खून

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी :—** अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील मौजा टाकळघाट ता. हिंगणा जि नागपूर येथे दिनांक १२/१०/२०२२ चे ११.०० वा. ते ११.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— पंजाब हेमराज पाठेकर वय २८ वर्ष रा.नरखेड ता. नरखेड जि. नागपूर ह.मू. टाकळघाट भेन्डे यांचे घरी किरायाने, टाकळघाट ता. हिंगणा जि नागपूर हा सकाळी ०७.०० वा. दरम्यान इंडोरामा कंपनी येथे डयुटी करून घरी परत आला व पत्नीसोबत जेवन वगैरे करून सकाळी ११.०० वा. चे सुमारास मुलगा नामे— सारांश वय ११ महिने यास झोपवून फिर्यादी झोपला असता काही वेळाने पत्नी नामे— सौ.एकता पंजाब पाठेकर हिने ओरडत येवून फिर्यादीला सांगीतले की, 'मुलगा सारांश पाळण्यात दिसत नाही' त्यांनी त्याचा आजुबाजुला शोध घेतला असता घराचे छतावरील पाण्याच्या टंकीत तो पाण्यात बुडालेल्या स्थितीत मिळून आला. त्यास बाहेर काढून उपचाराकामी ॲम्बूलेन्सने प्राथमिक आरोग्य केंन्द्र टाकळघाट येथे त्यानंतर माया हॉस्पीटल बुटीबोरी येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मुलगा सारांश मरण पावल्याचे सांगीतले. त्यानंतर पोलीसांनी तसेच महिला पोलीसांनी फिर्यादीला व त्याच्या पत्नीस विचारपूस केली असता पत्नी आरोपी नामे— सौ.एकता पंजाब पाठेकर, वय २६ वर्ष रा. नरखेड ता. नरखेड जि. नागपूर ह.मू. टाकळघाट भेन्डे यांचे घरी किरायाने टाकळघाट ता. हिंगणा जि नागपूर हिने रडत रडत सांगीतले की, 'पती व माझे मध्ये दुधाच्या खर्चावरून वाद होत असल्याने, मी माझ्या मुलास रागाच्या भरात जिवे मारण्याच्या इरादयाने पाण्याच्या टाकीत टाकले, त्यामुळे माझा मुलगाा सारांश हा मरण पावला आहे'.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरक्षक अशोक कोळी मो नं. ९६५७८११११११ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. कन्हान :—** अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील नितेश किराणा स्टोर वार्ड क्र. ४ कन्हान येथे दिनांक १२/१०/२२ चे ०४.०० वा. ते ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— नितेश रामबाबु केसरवाने, वय ३८ वर्ष, रा. जेन रोड कांद्री, कन्हान तह: पारशिवनी यांचे स्वत:चे नितेश किराणा स्टोर या नावाची किराणा दुकान असुन यातील फिर्यादीचे मुलांनसाठी ब्रेड घेण्याकरीता दुकानाचा दरवाजा उघडला असता दुकानातील सामान अस्त—व्यस्त दिसुन आल्याने दुकानाचा आत पाहणी केली असता दुकानातुन १) ५ किलो बादाम भरणी कि. ३,४००/—रू., २) अंडे दोन ट्रे कि. ३,००/—रू., ३) शॅम्पु बॉटल १० नग १,०००/—रू., ४) बॉडी डिओ ४ नग कि. १,०००/—रू. असा एकुण कि. २१,७००/—रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेल्याचे दिसून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश पाल मो.क्र. ९५५२५१७२६८ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. देवलापार** :– अंतर्गत ०२ कि. मी अंतरावरील मौजा वडम्बा येथे दिनांक ११/१०/२२ चे २१.३० वा. ते २२.०० वा. सुमारास हिरामण पतीराम मरस्कोल्हे (मृतक), वय ५२ वर्ष, रा. कामठी ता. रामटेक हे आपले पीबी–२१/ई– ४०६५ क्रमांकाची मोपेड टीव्हीएस वेगो स्कुटी ने एनएच ४४ नागपूर कडून जबलपूर कडे जाणाऱ्या रोडने आपले घरी जात असता अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून स्कुटीला धडक मारून जखमी केले. या अपघातात हिरामण मरस्कोल्हे यांना उपचार कामी ग्रामीण रूग्णालय देवलापार येथे भरती केले असता डॉक्टरांनी उपचार करून पुढील उपचारकामी रेफर केल्याने नागपूर येथे जात असतांना रस्त्यामध्ये मरण पावले.

सदर प्रकरणी सरतर्फ पोलिस नाईक विजेय बिसेन पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि लक्ष्मी घोडके मो क्र. ९१७७९०७००४ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**